# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र.२५४/२०२३

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, नविन सुवर्णपदक/पारितोषिक प्रस्थापित करण्यासाठी डॉ.व्ही.बी.गायकवाड यांच्या अध्यक्षतेखालील समितीने प्रस्तावित केलेल्या सर्वसाधारण मार्गदर्शक तत्वांना मा.व्यवस्थापन परिषदेने ठराव क्र. म:२६९/२६०८२३ अन्वये मान्यता दिलेली आहे.

**<u>सुवर्णपदक/पारितोषिक देण्यासंदर्भात सर्वसाधारण मार्गदर्शक तत्वे :</u>**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठास सुवर्णपदक/पारितोषिक प्रदान करण्यासाठी कोणत्याही संस्था अथवा व्यक्तीकडून देणगी स्विकारायची असेल तर त्याचे सर्वसाधारण नियम व अटी खालीलप्रमाणे राहतील.

१. एका सुवर्णपदकासाठी/पारितोषिकासाठी देणगी **किमान रक्कम रू. ३,००,०००/— (अक्षरी तीन लाख) असावी, असे समितीने प्रस्तावित केले होते. परंतु मा.व्यवस्थापन परीषदेचा ठराव क्र. म:३३३/२६०८२३ व म:३३६/२६०८२३ दि. २६/०८/२०२३ नुसार देणगी किमान रक्कम रू. ५,००,०००/— (अक्षरी पाच लाख) असावी, असे निर्देशित केले आहे. देणगीदारांकडून प्रथम देणगी रक्कम स्विकारून त्याबाबतची पुढील कार्यवाही करण्यात यावी.**

२. पारितोषिकाची देणगी रक्कम कमीत कमी रू. ५,००,०००/— असल्यास येणाऱ्या व्याजातून त्यासाठीचा प्रशासकीय खर्च व इतर खर्च वगळून विद्यार्थ्यास किती रक्कम देता येईल, याबाबत वित्त व लेखा विभागाकडे चौकशी करून पुढील कार्यवाही करण्यात यावी.

३. परीक्षा प्रमाणपत्र विभागाकडून नविन सुवर्णपदक/पारितोषिक प्रस्थापित करण्याबाबतच्या नियम व अटी सर्व विद्यापीठ अधिकार मंडळांकडून मान्य करून घेतल्यानंतर वित्त व लेखा विभागाकडून देणगी स्विकारण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी. देणगीदाराकडून वित्त व लेखा विभागाला देणगी रक्कम प्राप्त झाल्यानंतर परीक्षा प्रमाणपत्र विभागामार्फत पुढील कार्यवाही करण्यात यावी.

४. सुवर्णपदक/पारितोषिक देण्यासाठी देणगीदाराकडून देणगीचा स्विकार करण्याचा अधिकार मा. व्यवस्थापन परिषदेस असेल, तसेच काही विशिष्ट परिस्थितीत मा. कुलगुरू मा.व्यवस्थापन परिषदेच्या वतीने सुवर्णपदकासाठी आवश्यक असलेली देणगी रक्कम स्वीकारू शकतात.

५. देणगीदाराने सुवर्णपदकासाठी/पारितोषिकासाठी दिलेली देणगी परत करता येणार नाही. तथापि कोणत्याही विशिष्ट परिस्थितीमध्ये देणगी रक्कम परत करण्याचा अधिकार मा. व्यवस्थापन परिषदेला असेल.

६. विद्यापीठ कायद्यातील तरतूदीनूसार नविन सुवर्णपदक/पारितोषिक देण्यासाठी मा.अधिष्ठाता मंडळाने मा.व्यवस्थापन परिषदेस शिफारस केल्यानंतर व मा. व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिल्यानंतर सुवर्णपदक प्रस्थापित/अस्तित्वात येईल.

७. देणगीदाराने सुवर्णपदकाचे/पारितोषिकाचे नाव, सुवर्णपदक/पारितोषिक कोणत्या परीक्षेसाठी दयावे त्या परीक्षेचे नाव व इतर अटी देणगीच्या प्रस्तावामध्ये देणे आवश्यक आहे.

८. सुवर्णपदकाच्या/पारितोषिकाच्या संदर्भातील अटी मा. कुलगुरू शक्यतो देणगीदाराच्या संमतीने ठरवतील.

९. सुवर्णपदक/पारितोषिक हे त्यास मान्यता मिळाल्यानंतरच्या पुढील शैक्षणिक वर्षात होणाऱ्या परीक्षेच्या निकालानुसार देण्यात येईल.

१०. सुवर्णपदकासाठी/पारितोषिकासाठी दिलेल्या देणगी निधी अंतर्गत दिले जाणारे सुवर्णपदक/पारितोषिक याचा लाभ कोणत्याही जाती, जमात, धर्म व महाविद्यालय यांना देता येणार नाही. तर विद्यापीठ स्तरावर उच्च गुणवत्तेनुसार प्रदान करण्यात येईल. (अपवाद यापूर्वी चालू करण्यात आलेले सुवर्णपदक/पारितोषिक)

११. एखादया सुवर्णपदकाच्या/पारितोषिकाच्या मुळ हेतूमध्ये काही कारणास्तव बदल करणे अपरिहार्य ठरल्यास अशा वेळेस सदर सुवर्णपदकाबाबत/पारितोषिकाबाबत निर्णय घेण्याचा अधिकार मा. कुलगुरू यांना असेल.

१२. सुवर्णपदक/पारितोषिक हे देणगी प्राप्त झाल्यानंतर एक वर्षानी घोषित करण्यात येईल. विशिष्ट परिस्थतीमध्ये देणगीदाराने एक वर्षाच्या व्याजासह देणगी दिल्यास सुवर्णपदक/पारितोषिक त्याच वर्षी घोषित करण्यात येईल आणि नजिकच्या पदवी प्रदान समारंभात देण्यात येईल.

१३. देणगीची रक्कम मा.वित्त व लेखा अधिकारी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या नावाने स्विकारली जाईल.

१४. देणगी निधीमधून मिळणाऱ्या व्याजाचा विनीयोग खालीलप्रमाणे होईल : व्याजाच्या १० टक्के रक्कम प्रशासकीय खर्चापोटी विद्यापीठ खात्यात जमा केली जाईल व व्याजाच्या १५ टक्के रक्कम तसेच खर्च वजा जाता शिल्लक राहणारी व्याजाची रक्कम मूळ निधीमध्ये जमा केली जाईल की ज्याद्वारे मूळनिधीमध्ये वाढ होण्यास मदत होईल.

१५. सुवर्णपदकासाठी तीन पेक्षा अधिक विद्यार्थी पात्र असल्याचे आढळल्यास सदर सुवर्णपदकाचे पारितोषिकात रूपांतर करण्याचे अधिकार विद्यापीठास असेल.

१६. व्याजाचा दर कमी झाल्यास अथवा देणगीदाराने दिलेल्या देणगी रक्कमेतून सुवर्णपदक देणे शक्य नसल्यास त्याचे पारितोषिकात रूपांतर करण्याचा अधिकार विद्यापीठास असेल. तसेच पारितोषिकाबाबतही व्याजाचा दर कमी झाल्यास अथवा देणगीदाराने दिलेल्या देणगी रक्कमेतून पारितोषिक देणे शक्य नसल्यास, त्याबद्दल वित्त व लेखा विभाग यांच्याकडून संबंधित देणगीदारास कळविण्यात येईल. तसेच त्यांच्याकडून वाढीव रक्कम घेऊन सदर पारितोषिक देण्यात येईल.

१७. सुवर्णपदक/पारितोषिक देण्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध नसल्यास त्याबाबतचा प्रस्ताव वित्त व लेखा अधिकारी यांच्यामार्फत सादर केला जाईल.

१८. सुवर्णपदकाच्या/पारितोषिकाच्या देणगी निधी विनीयोगाबाबत उदभवणाऱ्या कोणत्याही बाबी संदर्भात निर्णयाचे सर्व अधिकार मा.कुलगुरू यांना राहतील.

१९. या सर्व नियम व अटींचे **पुनरावलोकन दर तीन** वर्षांनी करण्यात येईल.

२०. ज्या व्यक्ती अथवा संस्थेच्या नावाने सुवर्णपदक/पारितोषिक दिले जाणार असेल त्या व्यक्ती/संस्थेचे समाजातील योगदान/चारित्र्य याची शहानिशा करूनच पुढील कार्यवाही करण्यात यावी.

२१. ज्या परीक्षांचे निकाल संबंधित महाविद्यालयाकडून परिपत्रक क्र. १२५ नूसार जाहिर केले जातात अशा अभ्यासक्रमातील सुवर्णपदक/पारितोषिक प्रस्तावित करण्यात येवू नयेत. तसेच स्वायत्त महाविद्यालयातील कोणत्याही अभ्यासक्रमासाठी सुवर्णपदक/पारितोषिक देण्यात येवू नये.

२२. सदरहू सुवर्णपदकास पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांने/विद्यार्थीनीने अध्यादेश क्र. १०९, ११० व १४३ ची पुर्तता करणे आवश्यक आहे. सदर सविस्तर अध्यादेश खालील प्रमाणे आहेत. **अध्यादेश १०९** — विद्यापीठातर्फे घेतल्या जाणाऱ्या कोणत्याही परीक्षेसाठी ठरविण्यात आलेल्या किमान कालावधीपेक्षा दोन वर्षांहून अधिक कालावधीनंतर एखादा विद्यार्थी त्या परीक्षेत उत्तीर्ण झालेला असेल तर तो विद्यार्थी त्या परीक्षेसाठी असणाऱ्या सुवर्णपदका/पारितोषिकासाठी पात्र धरला जाणार नाही. त्या अभ्यासक्रमासाठी आवश्यक ती शैक्षणिक पात्रता ज्यावेळी पूर्ण होत असेल त्या तारखेपासून हा कालावधी मोजण्यात येईल. **अध्यादेश ११** — कोणत्याही परीक्षेसाठी 'बहिस्थः विद्यार्थी/दुरस्थ विद्यार्थी' म्हणून परीक्षा देणारा विद्यार्थी हा हया परीक्षेसाठी असणाऱ्या सुवर्णपदका/पारितोषिक यासाठी पात्र धरला जाणार नाही. परंतु देणगीदारांकडून खास बहि:स्थ/दुरस्थ: विद्यार्थ्यांना सुवर्णपदका/पारितोषिक देण्यासाठी देणग्या प्राप्त झाल्या असतील तर ती सुवर्णपदका/पारितोषिक बहि:स्थ/दुरस्थ: विद्यार्थ्यांना देण्यात येतील. **अध्यादेश १४३** — एखादा विद्यार्थी अध्यादेशाचा फायदा देऊन एखादा विषयात अधिकचे गुण (ग्रेस मार्क) देऊन उत्तीर्ण केला गेला असेल अशावेळी त्या परीक्षेसाठी असणाऱ्या सुवर्णपदका/पारितोषिक यासाठी तो विद्यार्थी पात्र धरला जाणार नाही. **अध्यादेश १६८** — एखादा विद्यार्थी श्रेणीसुधार/क्रेडीट सिस्टिम योजनेखाली परीक्षेत बसला असल्यास कोणत्याही सुवर्णपदका/पारितोषिक पात्र ठरणार नाही.

२३. एखादया वर्षी प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणारा लायक विद्यार्थी/विद्यार्थीनी सुवर्णपदक मिळण्यास वरील कारणामुळे वा इतर कारणामुळे पात्र न ठरल्यास सदर सुवर्णपदक पुढील लायक विद्यार्थ्यास/विद्यार्थीनीस देण्यात येईल.

२४. काही कारणामुळे वरील अभ्यासक्रमात काही बदल झाला तर हे सुवर्णपदक त्या विषयाच्या समकक्ष अभ्यासक्रमास/विषयास देण्याचा अधिकार विद्यापीठास राहिल.

२५. एखादया वर्षी कोणत्याही कारणास्तव सुवर्णपदक न दिले गेल्यास सुवर्णपदकाची रक्कम देणगीच्या मूळ निधीमध्ये जमा करण्यात येईल.

२६. एखादया वर्षी समान पात्रतेचे दोन विद्यार्थी प्रथम आले असल्यास त्यावर्षी देण्यात येणारे सुवर्णपदक एकूण खर्चासाठी उपलब्ध असलेली रक्कम, तसेच निधी अपूरा असल्यास देणगीदाराकडून त्यासाठी प्राप्त होणारी अतिरीक्त रक्कम याची पुर्तता झाल्यानंतरच जाहिर करण्यात येईल.

२७.सुवर्णपदका/पारितोषिका संदर्भातील नियम व अटी ठरविण्यासंबंधिची सर्व कामे प्रमाणपत्र विभागाकडून केली जातील. तसेच त्यानंतर सुवर्णपदक/पारितोषिक देण्यासंदर्भातील कामे छाननी व तालिनीकरण विभागाकडून केली जातील. सुवर्णपदक पदवी प्रदान समारंभात वितरीत करण्याबाबतची काम प्रमाणपत्र विभागामार्फत केली जातील.

वरील पारितोषिकास/सुवर्णपदकास पात्र होण्यासाठी संबंधित विद्यार्थ्याने/विद्यार्थीनीने त्या पारितोषिकासाठी/सुवर्णपदकासाठी असलेले सर्व नियम व अटी पूर्ण करणे आवश्यक आहे. सदर परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना सूचित केले जाते की, वरील नमूद नियम व अटींची पूर्तता करणारे पारितोषिक/सुवर्णपदक यासाठीचे प्रस्तावच स्विकारण्यात येतील, कृपया याची सर्वांनी नोंद घ्यावी.

संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

दिनांक : २०/१०/२०२३
संदर्भ क्र. परीक्षा/प्रमाणपत्र/ 3239